# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई. यांचे कार्यालय


कक्ष क्रमांक २०२, दुसरा मजला कोकण भवन, नवी मुंबई. ४०० ६१४.

ई मेल आय डी coop.sward.maharashtra@gmail.com दुरध्वनी क्रं. ०२२ - २७५८५०८२


**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये अंशतः बदल आदेश**

जा.क्र.मुंबई/सनि/एस-वि/बी-४/ ६०९ /सन-२०१८

दिनांक २३/३/२०१८

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुदी

२) या कार्यालयाकडील दिनांक २६/१२/२०१७ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अन्वये निर्गमित केलेले आदेश

३) श्री कृष्णा कोत्तावार यांनी या कार्यालयास सादर केलेले दिनांक ६/३/२०१८ रोजीचे पत्र

४) या कार्यालयाकडील दिनांक ६/३/२०१८ रोजीचे पत्र

५) श्री राजेंद्र मोरे ,निवडणुक निर्णय अधिकारी यांनी या कार्यालयास दिनांक २२/३/२०१८ रोजी सादर केलेले पत्र

ज्याअर्थी अन्ना लुईस को-ऑप हौसिंग सोसा. लि. गुडविल मेन्शन, तळमजला सीटीएस नं. २८०, हरीयाली व्हिलेज, फिरोज शहा गोदरेज मार्ग विक्रोळी (पू), मुंबइ ८३. ( या संस्थेच्या नावाने वाचावे ) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे आणि,

ज्याअर्थी सदरची गृहनिर्माण संस्था ही सहकारी कायदा व मंजूर उपविधीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असल्याने तिचे कामकाज हे सहकारी कायदा व मंजूर उपविधी व सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांजकडून वेळोवेळी पारीत परीपत्रकानुसार कामकाज करणे बंधनकारक आहे .आणि,

२३/३/२०१८




Scanned by CamScanner

ज्याअर्थी सदर संस्थेवर या कार्यालयाकडून वाचावे क्रमांक २ नुसार श्री. आनंद पुंडलिक म्होळे यांची दिनांक २६/१२/२०१७ रोजी आदेशान्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली .आणि,

ज्याअर्थी श्री कृष्णा कोत्तावार यांनी या कार्यालयास सादर केलेले दिनांक ६/३/२०१८ रोजीचे पत्रान्वये ई -३ अंतीम मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट केले नसलेबाबत लेखी तक्रार अर्ज सादर केलेला आहे .आणि,

ज्याअर्थी या कार्यालयाकडील दिनांक ६/३/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्राधिकृत अधिकारी श्री आनंद म्होळे यांना मतदार यादीमध्ये आवश्यक तो बदल करुन श्री कोत्तावर यांचे नाव ई -३ अंतीम मतदार यादीमध्ये समाविष्ट करुन या कार्यालयास प्रमाणीत करणेसाठी सादर करणेबाबत कळविले होते .आणि,

ज्याअर्थी सदर पत्राचे अनुषंगाने श्री.आनंद म्होळे यांनी श्री कोत्तावर यांना त्यांचे नावे बिले अदा केली परंतु यादी प्रमाणीत करणेसाठी दिनांक १५/३/२०१८ रोजी सादर करुन प्रमाणीत करुन घेतली व निवडणुक निर्णय अधिकारी श्री राजेंद्र मोरे यांना दिनांक १८/३/२०१८ रोजी निवडणुकीचे वेळी दिली .सदर अंतीम यादी विहित मुदतीत निवडणुक निर्णय अधिकारी यांना न दिल्यामुळे निवडणुक प्रक्रिया पार पाडताना अडचणी निर्माण झाल्यामुळे प्रक्रिया पुर्ण करता आली नाही .आणि,

त्याअर्थी वर नमुद कारणास्तव संस्थेवर अंशत: बदलान्वये अन्य प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झालेली असल्याने खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

:- आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये मला प्राप्त अधिकारान्वये मी राजेश लव्हेकर , सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था एस विभाग, मुंबई व्दारा अन्ना लुईस को-ऑप हौसिंग सोसा. लि. गुडविल मेन्शन, तळमजला सीटीएस नं. २८०, हरीयाली व्हिलेज, फिरोज शहा गोदरेज मार्ग विक्रोळी (पू), मुंबइ ८३. या संस्थेवर श्री आनंद म्होळे



Scanned by CamScanner

याचेऐवजी अंशतः बदलान्वये श्री सतीश काकडे ,प्रमाणित लेखापरीक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे .

सदरचा आदेश आज दिनांक २३/३/२०१८ रोजी माझ्या सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत करण्यात येत आहे .

( राजेश लव्हेकर )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई

प्रत माहितीकरीता रवाना :-

१) श्री सतीश काकडे, प्राधिकृत अधिकारी

२/- आपणास कळविण्यात येते की आपण संस्थेच्या संपुर्ण दप्तराचा व मालमत्तेचा ताबा श्री आनंद पुंडलिक म्होळे, माजी प्राधिकृत अधिकारी यांचेकडून तात्काळ स्वीकारुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) आनंद पुंडलिक म्होळे, प्राधिकृत अधिकारी

२/- आपणास कळविण्यात येते की आपण संस्थेच्या संपुर्ण दप्तराचा व मालमत्तेचा ताबा श्री सतीश काकडे, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक यांना तात्काळ सुपूर्द करावा

३) मा.अध्यक्ष, मुंबई जिल्हा को ऑप.हौसिंग फेडरेशन लि, १०३ विकास प्रिमायसेस.१ ला मजला,बँक स्ट्रीट,फोर्ट,मुंबई -१

४) शाखाधिकारी ,मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि/ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि शाखा ------------

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई

R.V
26/03/2018.
A.O.

Scanned by CamScanner